**सोलापूर महानगरपालिका**

जा.क्र.युसीडी/७२/२०१७
नागरी समुदाय विकास प्रकल्प
सोलापूर दि.१३/०६/२०१७.

---

# जाहिर प्रकटन

महाराष्ट्र पथ विक्रेता (उपजिविका संरक्षण व पथ विक्री विनियमन) नियम २०१६ नुसार दि.०३/०८/२०१६ रोजीच्या नगर विकास विभागाकडील आदेशा नुसार सोलापूर महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील अशासकीय संघटना (NGO) इतर नागरी संघटना, समुदाय आधारित संघटना (CBO) निवासी कल्याण संघ, व्यापारी संघ व पणन संघ इत्यादीचे प्रतिनिधी सह नगर पथ विक्रेता समिती सदर प्रवर्गातील सदस्य नियुक्तीसाठी विविध नोंदणीकृत संघटना, सामाजिक संस्था इत्यादीकडून विहित नमुन्यात अर्ज मागविण्यात येत आहेत.

सदर पथ विक्रेत्याच्या समितीची नामनिर्देशीत सदस्यांची किमान आर्हताबाबत स्वसाक्षांकित कागदपत्र अर्जासोबत खालील प्रमाणे सादर करावीत.

१. संघटनेची किंवा संघाच्या नियम ११ च्या उप नियम (४) मध्ये नमुद केल्याप्रमाणे क्षेत्रातील सक्षम प्राधिकरणाकडे नोदंणी केलेली असावेत.
२. संघटना किंवा संघाचे मागील ३ वर्षाच्या अधिकृत लेखापरिक्षण अहवाल सादर करणे आवश्यक आहे.
३. संघटनेस किंवा संघास स्थानिक प्राधिकरणाने काळ्या यादी टाकलेले नसावे.
४. संघटना किंवा संघ त्या त्या वेळी अमंलात आलेल्या कोणत्याही कायद्यान्वये दोषी नसल्याबाबत हमीपत्र (undertaking) देण्यात यावे.
५. संघ किंवा संघटना यांना सक्षम प्राधिकरणाकडे नोंदणी केलेल्या त्यांच्या प्रवर्गामधील कामाचा किमान ५ वर्षाचा अनुभव असणे आवश्यक आहे.

वर नमुद केलेल्या सोलापूर महानगरपालिका क्षेत्रातील अशासकीय संघटना, समुदायावर आधारित संघटना किंवा निवासी कल्याण संघ तसेच व्यापारी संघ व पणन संघाचे प्रतिनिधीत्व करणा-या सदस्याची नगर पथ विक्रेता समितीच्या नामनिर्देशीत सदस्याची निवड करण्याकामी किमान आर्हता धारण करणा-या संस्थेचे/ संघटनेचे अर्ज दि. २८/०६/२०१७ रोजी दु.५.०० वा.पर्यंत मागविण्यात येत आहे.

महाराष्ट्र पथ विक्रेता (उपजिविका संरक्षण व पथ विक्री विनियम) (महाराष्ट्र) नियम २०१६ नुसार दि.०३/०८/२०१६ रोजीच्या आदेशाचे प्रत कार्यालयीन वेळेत संस्था / संघटना यांना पाहण्यासाठी ठेवण्यात आलेली आहे.

विहित नमुन्यातील अर्ज व या संबंधीचा शासन निर्णय अनुंषगिक माहिती महापालिकेच्या संकेत स्थळावर www.solapurcorporation.gov.in तसेच सहा.प्रकल्प अधिकारी, राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियान कक्ष (NULM) युसीडी सोलापूर महानगरपालिका, सोलापूर यांचे कार्यालयात उपलब्ध करण्यात आलेले आहे. विहित नमुन्यात नसलेल्या अर्धवट / अपुर्ण व मुदती नंतर प्राप्त अर्जाची नोंद घेतली जाणार नाही.

**अर्ज पाठवण्याचा पत्ता-** सहा.प्रकल्प अधिकारी, राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियान कक्ष (NULM) युसीडी, सोलापूर महानगरपालिका, सोलापूर. या बाबत काही अडचण असल्यास कार्यालयीन वेळेत (१०.०० ते ५.४५) भेटावे.

**आयुक्त**
**सोलापूर महानगरपालिका, सोलापूर.**